# RECLAIM THE NIGHT

2026

शुक्रवार 30 रोजी
पार्लमेंट हाऊस
रात्री 7 वाजता
KAURNA YARTA




अधिक माहितीसाठी
स्कॅन करा

न्याय • सुरक्षा • सर्वसमावेषकता

# शुक्रवार 30 रोजी

रात्री 7 वाजता • पार्लमेंट हाऊस

KAURNA YARTA • ADELAIDE

'Reclaim the Night' हा जागतिक स्तरावरील जनजागृती व सामाजिक उपक्रम आहे. लैंगिक हिंसाचाराचे निर्मूलन करणे, हिंसाचाराला बळी पडलेल्या व्यक्तीलाच दोष देण्याची प्रवृत्ती थांबवणे, तसेच सुरक्षित, न्याय्य समाजाच्या निर्मितीसाठी ठोस कृती करण्याचे आवाहन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

## चला, राजकारणी आणि समाजाला ठामपणे सांगूया की:

- आपल्या घरादारात, रस्त्यांवर, खेळ, समूहात कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक हिंसाचाराला आता पूर्णविराम देण्याची वेळ आली आहे.
- प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या आरोग्याची काळजी, स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, स्वतःच्या शरीरावर स्वतःचा अधिकार आणि स्वतःची ओळख जपत सन्मानाने जगण्याचा हक्क आहे.
- दक्षिण ऑस्ट्रेलियामध्ये मानवी हक्कांचे संरक्षण, समानता, भेदभावविरोधी आणि द्वेषपूर्ण वर्तनाविरोधी कायदे अधिक सक्षम आणि प्रभावी करण्याची गरज आहे.
- कोणत्याही कामगाराला; त्याच्या व्यवसायाचे स्वरूप, वांशिक , सांस्कृतिक पार्श्वभूमी अथवा व्हिसा श्रेणी या बाबींवरून त्याचे हक्क व सुरक्षिततेपासून वंचित ठेवता कामा नये.
- लैंगिक हिंसाचारातून बचावलेल्या व्यक्तींना कोणते बदल आवश्यक आहेत, याची पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे त्यांच्या सेवांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्या आणि त्यांचे म्हणणे गांभीर्याने ऐका!

'RECLAIM THE NIGHT' हा सार्वजनिक जागांवर सर्वांचा समान हक्क प्रस्थापित करण्याचा उपक्रम आहे. घाना यार्ता (KAURNA YARTA) येथे आपण आपला आवाज उठवू, अभिमानाने आणि उत्साहाने एकत्र येऊ




आमची भूमिका वंशवादविरोधी आहे आणि द्वेषमुक्त रस्ते व समाजाच्या निर्मितीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ट्रान्सजेंडर व्यक्ती आणि लैंगिक कामगार यांचा समावेश व सन्मान हे आमच्या चळवळीचे अविभाज्य भाग आहेत. येथे प्रत्येकाचे स्वागत आहे. महिला, विविध लैंगिक आणि लिंग ओळख असलेल्या व्यक्ती, आदिवासी समुदायातील व्यक्ती, विविध सांस्कृतिक व भाषिक पार्श्वभूमी असलेल्या व्यक्ती आणि दिव्यांग व्यक्तींना अग्रस्थानी स्थान दिले जाईल.

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

पार्लमेंट हाऊसवरील भाषणे हि मूकबधिर व्यक्तींसाठी Auslan मध्ये उपलब्ध केली जातील.